पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - **०६**

**सभावृत्तांत**

दिनांक - **२५/०२/२०२१** वेळ - दुपारी **२.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची **पाक्षिक** सभा **गुरुवार** दिनांक **२५/०२/२०२१** रोजी दुपारी **२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती.सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते.

**१. मा.लोखंडे चंदा राजू - सभापती**
२. मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे
३. मा.सविता बाळकृष्ण खुळे
४. मा.राजापुरे माधवी राजेंद्र
५. मा.गायकवाड निर्मला मनोज
६. मा.कदम निकीता अर्जुन
७. मा.मंगला अशोक कदम
८. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

या शिवाय मा.चारठणकर- उप आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.ऐवले-सहा.समाज विकास अधिकारी, मा.मुंढे- प्र.शिक्षणाधिकारी(माध्यमिक), मा.डांगे- वैद्यकिय अधिकारी, मा.पानसरे-क्रीडा अधिकारी, मा.पानसरे- भांडार अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) शहरातील महिला बचत गटांना त्यांच्या व्यवस्थापनाचे प्रशिक्षण माविम च्या धर्तीवर देणेबाबत – मा.माधवी राजापुरे, मा.योगिता नागरगोजे यांचा प्रस्ताव

विषय क्र.२) मा.महिला व बालकल्याण समिती ठराव क्र.०८ दिनांक १५/०१/२०२१ मा.स्थायी समितीसभेकडे शिफारस करणेबाबत.- मा.योगिता नागरगोजे, मा.निकीता कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) बँक स्टेटमेंट न पाहता अनुदान देणेबाबत.- मा.योगिता नागरगोजे, मा.निकीता कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) राष्ट्रीयकृत बँक/पुणे जिल्हा मध्यवर्ती सह.बँक किंवा को-ऑप शेडयुल्ड बँकेतील खात्याबाबत- मा.योगिता नागरगोजे, मा.निकीता कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) माऊंट –आबू (राजस्थान) येथील प्रशिक्षणाकामी येणा-या खर्चास मान्यता घेणेबाबत- मा.माधवी राजापुरे, मा.निकीता कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) विधवा/घटस्फोटीत महिलांना पेन्शन योजना सुरु करणेबाबत – मा.सविता खुळे, मा.योगिता नागरगोजे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) महिला दिन साजरा करणेबाबत.– मा.योगिता नागरगोजे, मा.सविता खुळे यांचा प्रस्ताव.

अ) दिनांक २८/०१/२०२१ व ११/०२/२०२१ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक **०५**) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – १५ विषय क्रमांक - ०१

दिनांक – २५/०२/२०२१

सुचक :- मा.माधवी राजापुरे अनुमोदक : मा.योगिता नागरगोजे

संदर्भ – मा.माधवी राजापुरे, मा.योगिता नागरगोजे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात साधारण १२००० महिला बचत गट कार्यरत आहेत. महिलांना बचतीची सवय लागावी व गरजेच्या वेळी त्यांना त्वरित व कमी व्याजाच्या दराने कर्ज उपलब्ध व्हावे व गटांनी उद्योग वा व्यवसाय करून आपल्या कुटुंबाला आर्थिक हातभार लावावा या उद्देशाने बचत गट कार्यरत आहेत. काही बचत गट एकत्र येऊन काही व्यवसाय करीत आहेत. पण ही संख्या खूप कमी आहे. शहरात नोंदणी झालेल्या बचत गटांची संख्या खूप आहे. महानगरपालिकेकडून या बचत गटाना नियमित प्रोत्साहन दिले जाते. परंतु या गटांतील महिलांच्या बचत गटाचे सुयोग्य व्यवस्थापन करण्यासाठी गटांना, गटाविषयी शास्त्र शुद्ध पद्धतीने महिला आर्थिक विकास महामंडळाच्या धर्तीवर(माविम) प्रशिक्षण देणे ही बाब विचारात घेऊन पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील बचत गटांना गटाच्या व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्याबाबत ॐ ग्रामणै इंस्टीट्यूट फॉर एजुकेशनल एक्सलन्स पुणे यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर चर्चा होऊन प्रायोगिक तत्वावर सुरुवातीला १००० बचत गटांना गटांच्या व्यवस्थापनाचे शास्त्रशुद्ध पद्धतीने प्रशिक्षण घ्यावे. ॐ ग्रामणै इंस्टीट्यूट फॉर एजुकेशनल एक्सलन्स, पुणे ही संस्था महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीकडे नोंदणीकृत आहे. तसेच उद्योजकता सेक्टर स्किल कौन्सिल, भारत सरकारशी सल्लग्न आहे. संस्थेकडे ग्रामपंचायत पातळीवर महिलांसाठी कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्याचा अनुभव आहे. संस्थेने महाराष्ट्र राज्य महिला आयोग व आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेबरोबर कौशल्य विकास प्रशिक्षण राबवविलेले आहे. बचत गट व्यवस्थापनाचे शास्त्रशुध्द पध्दतीने प्रशिक्षण हे द्यावयाचे आहे. प्रशासकीय व तांत्रिक कामकाज करणे हे बचत गट प्रशिक्षण घेणा-या इतर संस्था म्हणजेच महाराष्ट्र महिला आयोग मार्फत तातडीने होणे शक्य नाही. तसेच तातडीने योजना सुरू होणेकामी निविदा पद्धतीने संस्था निवडीसाठी लागणारा प्रदीर्घ कालावधीचा विचार करता व संस्थेकडून प्रशिक्षणाचे सादर केलेले दरही रास्त असल्याने महिला व बालकल्याण प्रशिक्षण योजनेअंतर्गत थेट पद्धतीने बचत गट व्यवस्थापन प्रशिक्षण गटातील सदस्यासाठीची पात्रता निकष (अटी व शर्ती ) सोबतच्या प्रपत्र -अ मधील नमूद तपशील व अभ्यासक्रमानुसार व दरानुसार (सर्व करांसहित ) औद्योगिक प्रशिक्षण संस्था पिं.चिं.मनपा यांचा अभिप्राय घेऊन ॐ ग्रामणै इंस्टीट्यूट फॉर एजुकेशनल एक्सलन्स पुणे यांनी सादर केलेल्या शहरातील जनरल वर्गातील १००० बचत गटातील महिला सदस्यांना गटाच्या व्यवस्थापनाचे शास्त्रशुद्ध पद्धतीने प्रशिक्षण देण्यास व या प्रशिक्षणाच्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी या प्रशिक्षणाचा लाभ शहरातील चांगल्या १००० बचत गटांना व्हावा यासाठी संस्थेने विभागवार प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करावेत. या प्रशिक्षणात सहभागी होणा-या प्रशिक्षणार्थिसाठी सहभाग शुल्क असणार नाही. या योजनेच्या अंतर्गत प्रशिक्षण देताना, बचत गट प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थी संख्या जास्तीत जास्त १०० असावी. ॐ ग्रामणै इंस्टीट्यूट फॉर एजुकेशनल एक्सलन्स पुणे यांनी हे प्रशिक्षण मार्च २०२२ पर्यन्त पूर्ण करणे बंधनकारक राहील. सदर योजनेमध्ये आवश्यकतेनुसार बदल/दुरुस्ती करण्याचे/योजना अमलबजावणी संबंधीत निर्णय घेऊन योग्य ती कार्यवाही करून योजना राबविण्यासंबंधीतचे व सदर योजने अंतर्गतची देयके अदा करण्याचे सर्व

अधिकार मा.आयुक्त सो. यांच्या मान्यतेने मा.अतिरिक्त आयुक्त सो. यांना देणेस व सदर योजनेअंतर्गत होणारा प्रत्यक्ष खर्च हा महिला व बालकल्याणच्या तरतुदीतून करणेस मान्यता देणेस संभाव्य कामापोटी संस्थेस देय असलेल्या प्रत्यक्ष प्रशिक्षण शुल्काच्या रकमेच्या ५ % प्रमाणे होणारी रक्कम ही संस्थेकडून अनामत व लेखापरीक्षण पूर्ततेकामी म्हणून घेण्यात यावी. तथापि सदर अनामत रकमेच्या तुलनेत जादा काम होणार असेल तर त्यानुसारच्या संभाव्य जादा कामापोटीच्या ५% प्रमाणे होणारी रक्कम संस्थेकडून आगाऊ भरून घ्यावी. सदरची होणारी रक्कम मोठी असल्याने संस्थेच्या मागणीचा व त्यांच्या आर्थिक निकडीचा विचार करता चालू वर्षाचे काम पूर्ण झाल्यावर सदर रकमेपैकी ४% रक्कम संस्थेस त्वरित परत करावी. मात्र उर्वरित १% रक्कम ही मनपातील लेखपरीक्षणा नंतर लेखपरिक्षणातील सर्व आक्षेपाची १०० टक्के पूर्तता केल्यानंतर करावी. तरी शहरातील महिला बचत गटांचे सक्षमीकरण करण्यासाठी बचतगटाचे व्यवस्थापन शास्त्रशुध्द पध्दतीने कसे करावे. त्यासाठी प्रायोगिक तत्वावर १००० बचत गटांना त्यांच्या दैनंदिन व्यवस्थापनाचे महिला अर्थिक विकास महामंडळाच्या धर्तीवर(माविम) प्रशिक्षण देणेकामी व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

**प्रपत्र -अ**

**बचत गट क्षमता बांधणी कार्यक्रम**

| अ.क्र. | कार्यक्रमाचा तपशील | कालावधी | प्रती लाभार्थी प्रत्यक्ष शुल्क | प्रशिक्षण शुल्कावर GST १८% | GST सह एकूण प्रशिक्षण शुल्क |
|---|---|---|---|---|---|
| १ | बचत गटांसाठी महिलांना दैनंदिन व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देणे | ४ दिवस | ८४७ | १५३ | १००० |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १६ विषय क्रमांक - ०२

दिनांक – २५/०२/२०२१

सुचक :- मा.योगिता नागरगोजे अनुमोदक : मा.निकीता कदम

संदर्भ – मा.योगिता नागरगोजे, मा.निकीता कदम यांचा प्रस्ताव.

मा.महिला व बालकल्याण समिती ठराव क्र.०८ दिनांक १५/०१/२०२१ अन्वये विधवा महिलांना पुर्नविवाहानंतर संसार उपयोगी साहित्य घेणेकामी अर्थसहाय्य आणि विधवा महिलांच्या मुलींना लग्नानंतर संसार उपयोगी साहित्य घेणेकामी अर्थसहाय्य या दोन योजना प्रपत्र “अ” आणि प्रपत्र “ब” नुसार राबविणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहतर सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १७ विषय क्रमांक - ०३

दिनांक – २५/०२/२०२१

सुचक :- मा.योगिता नागरगोजे अनुमोदक : मा.निकीता कदम

संदर्भ – मा.योगिता नागरगोजे, मा.निकीता कदम यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मार्फत महिला बचतगटाला बचतगटाचे बँकेचे स्टेटमेंट पाहुण अनुदान दिले जाते. परंतु मार्च २०२० पासुन कोरोना (कोविड-१९) विषाणु चा प्रसार मोठया प्रमाणावर वाढल्याने संपुर्ण देशात लॉकडाऊन करण्यात आले होते. त्यामुळे प्रत्येकजण घरातच बसुन होते. त्यामुळे ब-याच जणांचे उत्पन्नाचे स्त्रोत बंद झाले असल्याने बँकिंग व्यवहार झाले नाहीत. महिला बचतगटातील महिलांना लॉकडाऊन काळात बँकेचे व्यवहार करता आले नसल्याने त्यांना अनुदान मिळण्यास अडचण निर्माण होत आहे. तरी त्यांचे माहे मार्च २०२० ते डिसेंबर २०२० या काळातील कोणतेही ६ महिन्याचे बँकेचे स्टेटमेंट न पाहता त्यांना अनुदान देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १८ विषय क्रमांक - ०४

दिनांक – २५/०२/२०२१

सुचक :- मा.योगिता नागरगोजे अनुमोदक : मा.निकीता कदम

संदर्भ – मा.योगिता नागरगोजे, मा.निकीता कदम यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील दिड वर्षे पूर्ण झालेल्या आणि दहा वर्षे पूर्ण झालेल्या महिला बचतगटांना अर्थसहाय्य देणे या योजना नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत राबविण्यात येतात. परंतु या योजनांच्या अटी शर्तीप्रमाणे महिला बचतगटाचे खाते राष्ट्रीयकृत बँकेत तसेच पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत खाते असणे आवश्यक आहे. परंतु राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडण्यासाठी महिला बचतगटांना अनेक अडचणी येत आहेत. त्यामुळे या अटीमध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तरी राष्ट्रीयकृत बँकेत/पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत किंवा को-ऑपरेटीव्ह शेडयुल्ड बँकेत खाते असणे आवश्यक आहे. अशी दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १९ विषय क्रमांक - ०५

दिनांक – २५/०२/२०२१

सुचक :- मा.माधवी राजापुरे अनुमोदक : मा.निकीता कदम

संदर्भ – मा.माधवी राजापुरे, मा.निकीता कदम यांचा प्रस्ताव.

अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत स्थानिक स्वराज्य संस्थेतील लोकप्रतिनिधी अधिकारी व कर्मचारी यांच्या करिता **माऊंट-आबू(राजस्थान)** येथे दिनांक २३ एप्रिल २०२१ ते दि २४ एप्रिल २०२१ रोजी दोन दिवसाचे प्रशिक्षण सत्र आयोजित केले आहे. या प्रशिक्षण सत्रात नागरी सेवा सुविधा वितरण व लोकप्रतिनिधींच्या जबाबदा-या, महाराष्ट्र महानगरपालिका कायद्यातील महत्वाच्या तरतुदी, सभाशास्त्र आणि घनकचरा व्यवस्थापन या विषयांची संपूर्ण माहिती दिली जाईल. तरी या दोन दिवसांच्या प्रशिक्षणासाठी प्रत्येकी र.रु.१४,७५०/-(अक्षरी र.रु.चौदा हजार सातशे पन्नास फक्त)प्रशिक्षण शुल्क आकारण्यात येईल. या शुल्कात व्याख्यात्यांचे मानधन व व्याख्यातांचा प्रवास खर्च, प्रशिक्षणार्थींची निवास व्यवस्था, चहापान, अल्पोहार, भोजन व वाचन साहित्यासाठी येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे

शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २० विषय क्रमांक - ०६

दिनांक – २५/०२/२०२१

सुचक :- मा.सविता खुळे अनुमोदक : मा.योगिता नागरगोजे

संदर्भ – मा.सविता खुळे, मा.योगिता नागरगोजे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात विविध विभागामार्फत नागरिकांना विविध नागरी सेवा सुविधा पुरविण्यात येतात. नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिला व बालकल्याण योजने अंतर्गत विविध लोककल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. पिंपरी चिंचवड शहरातील विधवा / घटस्फोटीत महिला स्वावलंबी होण्यासाठी महापालिकेच्या वतीने पुरेशी आर्थिक मदत देणे अत्यंत गरजेचे आहे. सध्या महापालिकेच्या वतीने मा.अटलबिहारी वाजपेयी-विधवा / घटस्फोटीत महिलांना किरकोळ स्वरुपाचा घरगुती व्यवसाय करण्यासाठी एकदाच अर्थसहाय्य देण्यात येत असून सदर अर्थसहाय्य अत्यंत तुटपुंजे व अल्प स्वरुपाचे असल्याचे दिसून येत आहे. असा सर्वंकष बाबींचा विचार करुन शहरातील विधवा / घटस्फोटीत महिलांना व्यवसाय करण्यासाठी कायमस्वरुपी एक पेन्शन योजना सुरु करण्यासाठी महिला व बालकल्याण समितीच्या माध्यमातून एक सर्वंकष धोरण आखून त्यास मा.महापालिका सर्वसाधारण सभेची मान्यता घेणेबाबत मा.प्रा.उत्तम प्रकाश केंदळे, सभापती- क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती यांचे दि.०३/०२/२०२१ रोजीचे पत्र व मा.सौ.उषा उर्फ माई मनोहर ढोरे, महापौर यांचे दि.०४/०२/२०२१ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे. तथापि, घरातील कर्ता व्यक्ती निवर्तल्यानंतर त्यांचेवर अवलंबून असणा-या कुटुंबातील इतर सदस्यांची कौटुंबिक आर्थिक परिस्थिती बिकट होत असल्याची बाब नाकारता येत नाही. तरी शहरातील विधवा / घटस्फोटीत महिला आत्मनिर्भर होण्यासाठी त्यांची आर्थिक गरज व कौटुंबिक अडीअडचणी लक्षात घेता कायमस्वरुपी पेन्शन योजना सुरु करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २१ विषय क्रमांक - ०७

दिनांक – २५/०२/२०२१

सुचक :- मा.योगिता नागरगोजे अनुमोदक : मा.सविता खुळे

संदर्भ – मा.योगिता नागरगोजे, मा.सविता खुळे यांचा प्रस्ताव

नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत दरवर्षी ८ मार्च हा जागतिक महिला दिन साजरा करण्यात येतो. परंतु कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढत असल्याने यावर्षाचा जागतिक महिला दिन हा ८ मार्च रोजी साजरा करण्याऐवजी कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव नियंत्रणात आल्यानंतर शासन निर्देशाप्रमाणे पुढील तारीख ठरवून साजरा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( लोखंडे चंदा राजू )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/९९/२०२१
दिनांक : ०१/०३/२०२१



( **उल्हास बबनराव जगताप** )
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

( विषय क्रमांक ०२ शी संलग्न )

## महिला बाल कल्याण योजना
## प्र पत्र अ

- **योजनेचे नाव** – **महर्षी धोंडो केशव कर्वे विधवा महिलांना पुनर्विवाहानंतर संसार उपयोगी साहित्य घेणेकामी अर्थसहाय्य.**

- **योजनेचे स्वरूप** – पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील विधवा महिलांनी पुनर्विवाह केल्यास त्यांना संसार उपयोगी साहित्य घेणेकामी र.रू. २५,०००/- अर्थसहाय्य देणे.

- **अटी व शर्ती** –

  - अर्जदार महिलेने अर्जासोबत आधारकार्डची सत्यप्रत जोडणे बंधनकारक. ( आधारकार्ड हे पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील असणे आवश्यक )
  - अर्जदार महिलेने अर्जासोबत मतदार ओळखपत्र / मतदार यादीची प्रत या दोन्हींपैकी एक अतिरिक्त पुरावा म्हणून जोडणे आवश्यक.
  - अर्जदार विधवा महिलेने अर्जासोबत पतीच्या मृत्यू प्रमाणपत्रची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक.
  - पुनर्विवाह केलेनंतर विवाह नोंदणी प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक.
  - सदर योजनेचा लाभ हा पुनर्विवाह केल्यानंतर ६ महिन्यांच्या आत घेणे आवश्यक आहे.

# महिला बाल कल्याण योजना

## प्र पत्र ब

- ❖ **योजनेचे नाव – महर्षी धोंडो केशव कर्वे विधवा महिलांच्या मुलींना लग्नानंतर संसार उपयोगी साहित्य घेणेकामी अर्थसहाय्य देणे .**

- ❖ **योजनेचे स्वरूप –** विधवा महिलांच्या मुलींना लग्नानंतर संसार उपयोगी साहित्य घेणेकामी र.रू. २५,०००/- अर्थसहाय्य देणे.

- ❖ **अटी व शर्ती –**

  - ➢ अर्जदार महिलेने अर्जासोबत आधारकार्डची सत्यप्रत जोडणे बंधनकारक. ( आधारकार्ड हे पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील असणे आवश्यक ) तसेच आधारकार्ड हे आई आणि मुलगी दोघींचे जोडावे .
  - ➢ अर्जदार महिलेने अर्जासोबत रेशनकार्ड जोडणे आवश्यक रेशनकार्डात आईचे व मुलीचे नाव असणे आवश्यक. ( रेशनकार्ड हे पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील असणे आवश्यक )
  - ➢ अर्जदार महिलेने अर्जासोबत मतदार ओळखपत्र / मतदार यादीची प्रत या दोन्हींपैकी एक अतिरिक्त पुरावा म्हणून जोडणे आवश्यक. ( आई आणि मुलगी दोघींचे )
  - ➢ विवाहीत मुलीचे विवाह नोंदणी प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक.
  - ➢ अर्जदार विधवा महिलेने अर्जासोबत पतीच्या मृत्यू प्रमाणपत्रची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक.
  - ➢ अर्जदार विधवा महिलेने मुलीच्या लग्नानंतर ६ महिन्यांच्या आत सदर योजनेचा लाभ घेणे आवश्यक आहे.
  - ➢ अर्जदार विधवा महिलेच्या पहिल्या दोन मुलींसाठी सदरचे अर्थसहाय्य देण्यात येईल.